# विधानसभा नियम समिती

विधानसभा नियम समितीत ११ सदस्यांचा समावेश असून मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे पदसिध्द समिती प्रमुख असतात. सभागृहातील कामकाजाची पध्दती व ते चालविण्याची रीती यांचे नियमन करण्यासाठी असलेल्या नियमांचा विचार करुन त्यात आवश्यक वाटतील अशा सुधारणा तसेच सदस्यांनीही सुचविलेल्या सुधारणा यांचा विचार करुन नियमात बदल सुचविणे, हे या समितीचे काम आहे.

समितीच्या शिफारशी सभागृहापुढे मांडण्यात येतात आणि त्या अशा रीतीने मांडण्यात आल्याच्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या दहा दिवसांच्या मुदतीत, कोणत्याही सदस्यास अशा शिफारशींमध्ये कोणतीही सुधारणा करण्याची सूचना देता येते. अशाप्रकारे देण्यात आलेली कोणतीही सूचना समितीकडे विचारार्थ सोपविण्यात येते आणि समिती, त्यावर विचार करुन तिला योग्य वाटतील असे बदल तीच्या शिफारशीत करते. सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणा विचारात घेतल्यानंतर समितीचा अंतिम अहवाल पटलावर ठेवण्यात येतो. त्यानंतर , समितीच्या सदस्याने मांडलेल्या प्रस्तावावरील अहवालास सभागृहाने मान्यता दिल्याप्रमाणे नियमातील सुधारणा राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतात. तसेच अशा सुधारणांची नोटीस दहा दिवसांच्या आत देण्यात आली नाही तर, समितीच्या शिफारशी सभागृहाने मान्य केल्या आहेत असे मानले जाऊन उक्त मुदत संपल्यानंतर समितीने शिफारस केल्याप्रमाणे नियमांतील सुधारणा राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतात. अशा प्रकारे नियमांतील सुधारणा त्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यावर अंमलात येतात. (महाराष्ट्र विधानसभा नियम २२३ ते २२५)